| | |
|---|---|
| PUBLICATION NAME : | Dainik Sakal |
| EDITION : | Mumbai |
| DATE : | 08/12/23 |
| PAGE : | 9 |

# दिव्यांग व्यक्तींना रोजगारसंधी

मुंबई, ता. ७ : आंत्रप्रेन्युरशीप अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने केंद्र सरकारच्या सामाजिक कल्याण आणि सक्षमता मंत्रालयाच्या सहकार्याने दिव्यांगासाठी मोठ्या प्रमाणावर रोजगारसंधी निर्माण करण्यासाठी सहकार्य केले. यासंदर्भात आज कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सीएसआर उपक्रमांअंतर्गत दिव्यांग व्यक्तींना खात्रीशीर रोजगार मिळवण्यासाठी मदत करण्याच्या दृष्टीने ही परिषद आयोजित करण्यात आली होती.

नॅशनल हँडीकॅप्ड फायनान्स डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे सरव्यवस्थापक डॉ. विनीत राणा, एसबीआय फाउंडेशनचे अध्यक्ष जगन्नाथ साहू, महाराष्ट्र स्मॉलस्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र निंबाळकर, आयडीबीआय बँकेच्या सौम्या चौधरी उपस्थित होते.

दिव्यांग व्यक्तींसाठी तंत्रज्ञानावर आधारित १५०० उद्योग आणि १५०० इतर उद्योग अशा ३००० नव्या उद्योगांची स्थापना करण्याविषयी यावेळी चर्चा करण्यात आली. या महत्त्वाकांक्षी परिषदेत सरकार, कॉर्पोरेट्स व संस्थांच्या मदतीने दिव्यांग व्यक्तींसाठी अधिक चांगले वातावरण तयार करण्याविषयी विचार मांडले गेले. शाश्वत उद्योगांची निर्मिती करून दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्याच्या उद्दिष्टावर या चर्चेत भर देण्यात आला.

## विविध उपक्रम

दिव्यांग व्यक्तींसाठी जागरूकता अभियान, किशोरवयीन दिव्यांग व्यक्तींसाठी आवश्यक जीवनकौशल्यांचे प्रशिक्षण, व्यावसायिक संधींचे स्त्रोत तयार करणे, कर्जासाठी पाठिंबा, यासंदर्भातही सूचना करण्यात आल्या. दिव्यांग व्यक्तिंना सक्षम करण्यासाठी एनएचएफडीसी महत्त्वाची भूमिका बजावत असल्यावर डॉ. विनीत राणा यांनी भर दिला.